दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ८९ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.२४ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

Scan QR code to visit... Epaper Portal

# मराठ्यांचा जणसागर मुंबईत धडकणार



## २० जानेवारी पासून जरांगे पाटलांचं मुंबईत आमरण उपोषण..

**बीड: मराठा समाजाच्या आरक्षणासाठी २० जानेवारीपासून मुंबईच्या आझाद मैदानावर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा बीडच्या निर्णायक इशारा सभेतून मनोज जरांगे यांनी दिला. मराठा आरक्षणाच्या संदर्भाने मनोज जरांगे यांनी सरकारला दिलेली डेडलाईन रविवारी (दि.२४) संपत आहे.या पार्श्वभूमीवर शनिवारी बीडमध्ये मनोज जरांगे यांची निर्णायक इशारा सभा आयोजित करण्यात आली होती. शहराच्या वळण रस्त्यावरील संभाजी महाराज चौकालगतच्या पाटील मैदानात या सभेसाठी लाखोंच्या संख्येने मराठा समाज जमला होता. या सभेतून जरांगे यांनी पुढील आंदोलनाची दिशा स्पष्ट केली.**

२० जानेवारीला मुंबईच्या आझाद मैदानावरउपोषण करणार असल्याचा इशारा जरांगे यांनी दिला. सभेत जरांगे म्हणाले की हा जमलेला समाज म्हणजे मराठयांचा महाप्रलय आहे. हिंसाचाराच्या नावाखाली निष्पाप मराठे गुंतविले, पण भिणार तो मराठा कसला? आमच्या समाजाला विनाकारण डाग लावला. निष्पाप पोरांना गुंतविण्याचे षडयंत्र सरकारने केले. मराठ्यांना राज्यात शांतता हवी आहे. हा मराठा कधीच कोणाच्या घरावर जाऊ शकत नाही. यांनीच यांचे घर जाळले आणि आमच्या पोरांची नावं घेतली असे जरांगे म्हणाले. मी सरकारला चंपावती नगरीतून विनंती करतोय, सरकार शहाणपणाची भूमिका घ्या, भुजबळ एकटयाचे ऐकून अन्याय कराल तर जड जाईल. मराठा समाज खवळला तर तुमचा राजकीय अस्तीत्वाचा सुपडा साफ होईल. नविन नविन प्रयोग करु नका, ठरल्याप्रमाणे मराठा समाजाला आरक्षण द्या, नाहीतर पुढचं आंदोलन झेपणार नाही आहे असे जरांगे म्हणाले.महाराष्ट्रातील मराठा समाज हाच माझा परिवार आहे. मी स्वतःला या परिवारासाठी समर्पित केलय. ही एकजुटिची ताकत वाया जाऊ देणार नाही. मी मॅनेज होत नाही हीच सरकारची अडचण आहे. मराठा समाजाच्या लेकरांच्या चेहऱ्यावर हसू बघायच हेच माझं स्वप्न आहे. मराठा समाजाच्या नोंदी सापडल्या, त्यांना आरक्षण मागतो म्हणून ते मला शत्रू मानायलेत. आमच्या लेकरांचे मुडदे पडायलेत. सरकार मराठा समाजाची फसवणूक करतय. सरकार गांभीर्याने घेत नाही. सरकारला वठणीवर आणण्याची ताकत मराठ्यांमध्ये आहे. मराठ्यांची लेकरं आत्महत्या करतायत, आणि सरकारला लाज वाटत नाही. सरकारला मराठा जात संपवायची आहे. मराठा समाजाला डवचू नका असे आवाहन जरांगे यांनी सरकारला केले.आंदोलन करायचय, पण ते शांततेत करायच आहे. आरक्षण घेतल्याशिवाय मागे हटायच नाही. आम्हाला कुठं जायची हौस नाही, पण आम्ही सहन तरी किती दिवस करायचं? आम्हाला सुध्दा मर्यादा आहेत असे सांगून जरांगे यांनी पुढच्या आंदोलनाची दिशा स्पष्ट केली.तत्पूर्वी बीड शहरातून मनोज जरांगे यांची मोठी रॅली काढण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून अण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयांना अभिवादन करित बार्शीनाका मार्गे रॅली सभास्थळी पोहचली. रॅली दरम्यान ठिकठिकाणी मनोज जरांगे यांच्यावर जेसीबीच्या माध्यमातून आणि सभास्थळी हेलिकॉप्टरच्या माध्यमातून पुष्पवृष्टी करण्यात आली.



### भुजबळ यांच्यावर टीका...

**या सभेत मनोज जरांगे यांनी पुन्हा छगन भुजबळ यांच्यावर टीका केली. मी छगन भुजबळला उलथापालथा करतो, माझ्या नादी कशाला लागायचं? मी शांत बसलो तरी माझ्याबद्दल काहीही बोलतो, भुजबळ महाराष्ट्राला कलंक आहेत. आरक्षण मिळुद्या मग कचका दाखवितो, माझ्या नादी लागू नका, मी लई बेक्कार माणूस आहे असे जरांगे म्हणाले.**

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बल्लारपूर (विसापूर) तालुका क्रीडा संकूल येथे होणा-या ६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेच्या पूर्वतयारीचा आढावा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज (दि.२३) घेतला. विसापूर येथील क्रीडा संकुलाला भेट देऊन त्यांनी व्यवस्थेची पाहणी केली व संबंधितांना सुचना दिल्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, सहायक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., विशेष कार्य अधिकारी डॉ. विजय इंगोले, मनपा आयुक्त विपील पालीवाल, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, जिल्हा पुरवठा अधिकारी अजय चरडे, उपविभागीय अधिकारी स्नेहल राहाटे, तहसीलदार डॉ. कांचन जगताप, हरीश शर्मा, राहुल पावडे, डॉ. मंगेश गुलवाडे आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, स्पर्धेच्या आयोजनासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. सर्व समित्यांनी एकमेकांत समन्वय ठेवावा. तसेच




शासकीय, अशासकीय सदस्य आणि स्वयंसेवकांनी चर्चा करून सुक्ष्म नियोजन करावे. जिल्हा प्रशासनाचे सर्व अधिकारी, क्रीडा संघटना, त्यांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी या स्पर्धेच्या यशस्वीकरीता दिवसरात्र काम करीत आहे. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून चंद्रपूर, बल्लारपूरचे नाव देशपातळीवर पोहचून जिल्ह्याचा नावलौकिक होणार आहे. त्यामुळे प्रत्येकाने या स्पर्धेकरीता उत्स्फुर्तपणे आपले योगदान द्यावे. बाहेरून येणा-या खेळाडूंना निवास, वाहतूक, भोजन आदी व्यवस्थेसंदर्भात माहिती उपलब्ध करून द्यावी. खेळाडूंना काही अडचणी आल्या तर त्याचे निराकरण करण्यासाठी मदत कक्ष, संपर्क क्रमांक, चॅटबॉट आदी व्यवस्था सज्ज ठेवाव्यात. खेळाडूंना घेऊन येणा-या प्रतिनिधींसोबत समित्यांनी समन्वय ठेवून त्यांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी, अशा सुचना जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी दिल्या.यावेळी जिल्हाधिका-यांनी संपूर्ण टीमसह, नोंदणी कक्ष, स्वागत कक्ष, भोजन व्यवस्था कक्ष, पार्किंगची व्यवस्था, क्रीडा मैदान, सांडपाणी व्यवस्था आदींची पाहणी केली.

## मतदारांपर्यंत पोहचणार ईव्हीएम व व्हीव्हीपॅट जनजागृतीचा चित्ररथ

### जिल्ह्याधिकाऱ्यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून चित्ररथ रवाना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे आगामी लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणुका - २०२४ च्या अनुषंगाने, इलेक्ट्रॉनिक व्होटींग मशीन (ईव्हीएम) व व्हीव्हीपॅट वापराबाबत एलईडी चित्ररथाद्वारे जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. सदर मोहीम चंद्रपूर जिल्ह्यात फेब्रुवारी २०२४ अखेरपर्यंत राबविण्यात येणार असून जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते नियोजन भवन येथे चित्ररथाला हिरवी झेंडी दाखविण्यात आली. यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, आगामी लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने ईव्हीएम / व्हीव्हीपॅटबाबात प्रचार प्रसिध्दी आणि लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी १० डिसेंबर २०२३ ते २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण २०३२ मतदान केंद्र, प्रत्येक शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्टेशन, बस स्टँड, गाव / शहरातील मुख्य चौक, बाजारपेठ, नाका, शासकीय कार्यालये,



सभेची ठिकाणे इत्यादी मौक्याच्या ठिकाणी फिरत्या वाहनांद्वारे सदर मोहीम राबविण्यात येईल. या जनजागृती मोहिमेमध्ये प्रशिक्षण व प्रात्यक्षिक करून दाखविण्यात येणार आहे. पुढे जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट जनजागृती मोहिमेमध्ये मतदान प्रक्रियेसंबंधी माहिती जाणून घेणे, मतदान यंत्राबाबत आवश्यक माहिती घेणे, प्रत्यक्ष मतदान करणे, आपण केलेल्या मतदानाप्रमाणेच निकाल येतो का, ते तपासणे, याबाबत नागरिकांच्या मनात काही शंका असल्यास त्याचे निरसन करणे, तसेच व्हीव्हीपॅटबाबत माहिती जाणून घ्यावी. जिल्ह्यातील प्रत्येक मतदारांपर्यंत ही जनजागृती मोहीम पोहचेल, असे नियोजन जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आली आहे. याचा लाभ जिल्ह्यातील सर्व मतदारांनी घ्यावा. तसेच येणा-या निवडणुकीत आपल्या मतदानाचा अधिकार बजावून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले.यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी दगडू कुंभार यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आदी उपस्थित होते.

## पोषण सुरक्षे करिता भरडधान्याचा वापर आवश्यक-डॉ.अमोलकुमार सोळंके

**वरोरा । प्रतिनिधी**

सध्या आपल्या देशातील अन्नसुरक्षितता मजबूत असून आता आपल्याला पोषण सुरक्षे कडे जायचे आहे त्याकरिता भरड धान्याचा वापर हा अतिशय आवश्यक आहे असे प्रतिपादन अध्यक्ष स्थानावरून बोलताना वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अमोलकुमार सोळंके यांनी सोमवारी चारगाव येथील शेतकरी मेळाव्यात केले.

भारतीय कृषी अनुसंधान संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय वनस्पती जैवतंत्रज्ञान संस्था नवी दिल्ली, कृषी विभाग महाराष्ट्र राज्य, आनंद निकेतन कृषी महाविद्यालय वरोरा तथा ध्रुवतारा ॲग्रो फार्मर प्रोडूसर कंपनी लिमिटेड वरोरा च्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षाच्या पर्वावर शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.या मेळाव्याला उद्घाटक म्हणून सुशांत लव्हटे उपविभागीय कृषी अधिकारी वरोरा , प्रमुख पाहुणे डॉ. पी के मंडल मुख्य शास्त्रज्ञ नवी दिल्ली , डॉ. नवीन गुप्ता वरिष्ठ शास्त्रज्ञ नवी दिल्ली तर मार्गदर्शक म्हणून डॉ. सतीश इमडे सहाय्यक प्राध्यापक आनंद निकेतन कृषी महाविद्यालय वरोरा ,डॉ रामचंद्र महाजन आनंद निकेतन कृषी महाविद्यालय वरोरा, यशवंत सायरे मानद सचिव वैनगंगा शेतकरी उत्पादक कंपनी संघ चंद्रपूर, बालाजी ढोबे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा संचालक कांचनी फार्मर प्रोड्युसर कंपनी, योगेश वायदुडे सरपंच चारगाव (बु) , दयारामजी ननावरे अध्यक्ष विविध सहकारी सोसायटी चारगाव , अभिजीत पावडे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती वरोरा, विजय काळे कृषी अधिकारी वरोरा हे मान्यवर उपस्थित होते.उद्घाटक म्हणून बोलताना सुशांत लव्हटे उपविभागीय कृषी अधिकारी वरोरा यांनी शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी




विविध योजनांच्या माध्यमातून उभे असून त्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा तसेच जमिनीतील पोषक मूलद्रव्ये वाढवावे असे आवाहन प्रसंगी केले, प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत असताना डॉ रामचंद्र महाजन यांनी भरड धान्याचे मानवी जीवनातील महत्त्व आणि त्याचा वापर अधिकाधिक कसा करता येईल यावर मार्गदर्शन केले तसेच डॉ सतीश इमडे यांनी स्थानिक वातावरणामध्ये कुठल्या भरड धान्य उत्पादनावर भर द्यावा याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून भरडधान्याच्या विपणासंदर्भात बालाजी धोबे, यशवंत सायरे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. मेळाव्यात शेतकऱ्यांना शेतीच्या दैनंदिन वापरातील उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले . सदर कार्यक्रमाचे संचालन स्मिता सोनेकर, चंद्रशेखर झाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रवीण भांडारकर यांनी केले . मेळाव्याचे आयोजन कंपनी चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा संचालक संदीप सोनेकर यांच्या नेतृत्वात कंपनी संचालकांच्या मदतीने करण्यात आले . सदर कार्यक्रमाला पंचक्रोशीतील जवळपास २५० शेतकरी तथा शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

संपादकीय

# नवी 'संहिता'


न्यायाची भाषा केवळ कायद्याच्या पुस्तकात न ठेवता ती प्रशासकीय कारभारात आणावी. आपल्याकडे कायद्याइतकाच; किंबहुना त्याहून जास्त गंभीर प्रश्न कायद्याच्या सक्षम अंमलबजावणीचा आहे, याचे भान विसरता कामा नये.काळ जसा बदलतो, तशी कायद्याची चौकटही बदलावी लागते. त्यादृष्टीने सरकारने चालविलेल्या प्रयत्नांतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे फौजदारी कायद्यातील सुधारणा. नव्या प्रश्नांना भिडण्याचा प्रयत्न तर त्यात आहेच; परंतु या बदलांना राष्ट्रवादाची झालरही आहे. वसाहतवादी मानसिकतेतून देशाला बाहेर काढणे हे आपले उद्दिष्ट असल्याचे सरकारकडून सांगण्यात येत आहे.साम्राज्यवादी हितसंबंध सुरक्षित ठेवणे हा ब्रिटिशांचा कायदे तयार करताना हेतू होताच. त्यामुळे शिक्षा नव्हे, तर न्याय हा हेतू ठेवून बदल घडवित असल्याचे सरकारच्या वतीने सांगण्यात आले. त्यामुळेच वसाहतवादी ब्रिटिशांनी आणलेल्या भारतीय दंडसंहितेऐवजी भारतीय न्यायसंहिता, तसेच फौजदारी दंडसंहितेऐवजी भारतीय नागरी सुरक्षा संहिता आणि भारतीय पुरावा कायद्याऐवजी भारतीय साक्ष संहिता लोकसभेत सादर करून त्यावर सभागृहाची मान्यतेची मोहोर उमटवून घेतली आहे.नवी संहिता बनवताना तज्ज्ञांकडून सूचना घेतल्या नाहीत, नवीन विधेयके म्हणजे सध्याच्या कायद्याचे कॉपी पेस्ट स्वरूप आहे, ते घाईघाईने सादर केले, असे आक्षेप होते. यावेळी ही विधेयके सादर करत असताना सरकारने त्या आक्षेपांची बऱ्यापैकी दखल घेतली व त्यात सुधारणाही केल्या, हे चांगले झाले.मात्र एवढ्या महत्त्वाच्या विधेयकांवर संसदेत सर्वांगीण चर्चा होऊ नये, हे अगदीच खटकणारे आहे. लोकसभेत ही विधेयके मंजूर होत असतानाच विरोधी बाके रिकामी होती. विरोधकांचा चर्चेत सहभाग असता तर या परिवर्तनाचे मोल वाढले असते.हे तीनही कायदे आणताना सरकारने अनेक कलमे, त्यांचे स्वरुप तसेच ठेवले आहे. त्यांचे क्रम बदलले आहेत. तसेच नव्याने काही बाबींच्या व्याख्या करणे, त्याला व्यापक स्वरुप देण्याचे मार्गही अवलंबले. राजद्रोहाऐवजी देशद्रोह असा शब्दप्रयोग करत असताना देशाच्या सार्वभौमतेला, अखंडतेला बाधा येऊ नये, यासाठी कसून पावले उचलल्याचा दावा करत आहे. तर व्यवस्थेविरुद्धचा आवाज क्षीण करण्याचा हा प्रयत्न असल्याचे विरोधक मानतात.दहशतवादाची व्याख्या अधिक व्यापक करताना ती बेकायदा कारवाया प्रतिबंधात्मक कायद्यासारखी (यूएपीए'सारखी) अधिक धारदार केली आहे. महिलांविषयक कायदे अधिक कठोर करणे, किरकोळ घटनांमध्ये शिक्षेऐवजी समाजसेवी कृत्ये करायला लावणे, अर्धी शिक्षा भोगल्यानंतर तुरुंगातून सुटकेचा मार्ग, पोलिसांची जबाबदारी निश्चिती अशा कितीतरी सुधारणाही त्यात आहेत. तथापि, नव्या विधेयकातील काही तरतुदी पोलिसी कारवाई, पोलिस यंत्रणा आणि सरकारला अवास्तव बळ देणाऱ्या आहेत.त्यामुळेच कायद्याच्या अंमलबजावणीचा मुद्दा कळीचा ठरणार आहे. कायद्यातील बदलांपेक्षा या आव्हानाला सामोरे कसे जाणार, यावर खरे तर अनेक गोष्टी अवलंबून असतील. हा मुद्दा प्रकर्षाने जाणवतो, तो वर्तमानातील वास्तवामुळे. विद्यमान सरकारने ज्याप्रमाणे केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), सक्तवसुली संचालनालय (ईडी) यांचे मोकळ्या हाताने वापर करून विरोधकांना सळो की पळो करून सोडले त्यावरून याविषयीची शंका गैरवाजवी म्हणता येणार नाही.पोलिस कोठडीत पंधराऐवजी नव्वद दिवसांपर्यंत ठेवता येणे, पोलिसांना प्रतिबंधात्मक दिलेले अधिकार आणि कोणत्याही कायदेशीर बाबीसाठी व्यक्तीची माहिती, हाताचे ठसे, सह्या यांचे संकलनाचे दिलेले अधिकार अशी काही उदाहरणे देता येतील.नवीन कायदे आणत असताना सरकारने कोणत्याही कार्यवाहीसाठी घातलेली वेळेची बंधने, यंत्रणेतील घटकांचे निश्चित केलेले दायित्व या स्वागतार्ह बाबी आहेत. विशेषतः पहिल्या सुनावणीनंतर पोलिसांनी सात दिवसांत चलान देणे, तपासप्रक्रिया नव्वद दिवसांत पूर्ण करणे, राखीव ठेवलेल्या निकालावर तीस दिवसांत निकाल देणे यामुळे न्यायप्रक्रिया गतिमान व्हायला मदत होणार आहे.न्यायवैद्यकशास्त्राचा वापर व्यापक करणे, काही गुन्ह्यांच्या तपासात त्यांचा वापर करणे, साक्षीपुराव्यात दृकश्राव्य पुराव्यांवर अधिक भर देणे, झीरो एफआयआरमुळे तक्रार नोंदवणे सोपे करणे या महत्त्वाच्या बाबी म्हणता येतील. शिवाय, सुनावणीप्रक्रियेत दृकश्राव्य साधनांच्या अंशतः वापरास विधिमान्यता हेदेखील योग्य म्हणावे लागेल.सरकारच्या या न्यायिक सुधारणांमध्ये झुंडशाही, द्वेषमूलक विधानांना दंडात्मक कारवाईने वेसण घालण्यासाठी पावले उचलली हे बरे झाले. गेल्या दशक-दीड दशकापासून त्याचा वाढलेला उच्छाद डोकेदुखी ठरला आहे. व्यभिचाराबाबत सरकारने उचललेली वैधानिक पावले नव्या वादाला तोंड फोडू शकतात.वसाहतवादातून बाहेर पडण्याच्या नावाखाली जनतेच्या अभिव्यक्तीचा संकोच आणि पोलिसी खाक्याने अधिकाधिक जणांना धाकात ठेवण्याचा प्रयत्न होता कामा नये. हा आरोप चुकीचा आहे, असे वाटत असेल तर सरकारने कृतिशीलतेतून उत्तर द्यावे. न्यायाची भाषा केवळ कायद्याच्या पुस्तकात न ठेवता ती प्रशासकीय कारभारात आणावी. आपल्याकडे कायद्याइतकाच किंबहुना त्याहून जास्त गंभीर प्रश्न कायद्याच्या सक्षम अंमलबजावणीचा आहे, याचे भान विसरता कामा नये.

# अखेर फलित काय?



अखेर विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले. अत्यंत क्षीण ताकदीचे व विजीगिषू वृत्तीचा लवलेशही नसलेले विरोधक, त्यामुळेच निर्धास्त असलेले मात्र आपसात भूमिकाऐक्य नसलेले सत्ताधारी, लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विकास कामांच्या आभासी डोंगराएवढ्या विक्रमी ५५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या, त्यातील किती कोटी रुपयांचा हिस्सा मिळाला, याची शेखी मिरवणारे सत्ताधारी आमदार आणि याच हिश्श्यासाठी सत्ताधाऱ्यांकडे मोठ्या विरोधी नेत्यांनी केलेली यशस्वी शिष्टाई.. अशा वातावरणात नागपूरचे अधिवेशन संपले. त्याचे फलित सांगण्यासाठी खरे तर मोठ्या अभ्यासाचीच गरज आहे.तो कुणी विद्वान करेल तेव्हा करेल. मात्र, १९५३ मध्ये करण्यात आलेल्या करारानुसार या अधिवेशनात महाराष्ट्रात आलेल्या विदर्भाच्या प्रश्नांना अधिक प्राधान्य मिळावे, हे संकेत सत्ताधारी व विरोधक अशा दोघांनीही दुर्लक्षित केले, हेच खरे! या अधिवेशनात शेतकऱ्यांचे प्रश्न, अवकाळी पाऊस, दुष्काळ आदी विषयांवर सदस्यांनी विस्तृत चर्चा केली. दुसरीकडे मराठा आरक्षणाचाही प्रश्न कळीचा ठरला. मात्र, या चर्चांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेली उत्तरे ही राजकीय उत्तरे होती. अगदी अंतिम आठवडा प्रस्तावावरही मुख्यमंत्र्यांच्या भाषणाचे सार ठाकरे कुटुंबियांवर शरसंधान हेच राहिले. आता पक्षातून फुटून पुन्हा त्याच पक्षाची धुरा चिन्हासकट खांद्यावर आली असताना तीच ती टीका किती काळ जनतेसमोर मांडणार, हा नवाच प्रश्न उभा राहिला आहे. या अधिवेशनात काँग्रेस पक्षांतर्गत नेत्यांची स्पर्धा व त्यांच्या अंतर्गत राजकारणाचेही यथेच्छ प्रदर्शन झाले. प्रश्न वा चर्चा कोणतीही असो; काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले प्रत्येकावर अधिकारवाणीने बोलण्यासाठी उभे राहात होते. त्यांच्या या अधिकारवाणीचे गारूड शेवटी इतके झाले, की ज्या विरोधी पक्षाकडून येणाऱ्या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या चर्चेची सुरुवात विरोधी पक्षनेत्यांकडून केली जाते, तीही पटोलेंनीच सुरू केली. उरल्यासुरल्या सत्ताकेंद्रासाठीची ही चढाओढ पाहून सत्ताधाऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू न येते तरच नवल!विधिमंडळातील उपस्थिती व चर्चांमधील सहभाग याबाबत विरोधकांची उदासीनता स्पष्ट दिसत होती. विधिमंडळाबाहेर वाहिन्यांशी बोलण्यासाठी आसुसलेल्या नेत्यांची सभागृहातील चर्चांमध्ये सहभागी होण्याची वृत्ती, त्यासाठी लागणारा अभ्यास, इतरांचे विचार ऐकण्याची चिकाटी यांचा पूर्ण अभाव दिसला. अगदी अभ्यासू तरुण सभासद म्हणून ज्या आदित्य ठाकरे यांच्याकडे पाहण्यात येते; त्यांचीही सभागृहातील उपस्थिती फारशी नव्हती. सध्या ओबीसी हक्कांची धुरा खांद्यावर घेतलेले मंत्री छगनराव भुजबळ यांच्यापासून चार हात दूर राहण्याचे सर्व पक्षीय सदस्यांनी ठरवल्यासारखे चित्र सभागृहात दिसून आले. मराठा आरक्षणावर स्वतः मंत्र्यांनीच भाषण करण्याचा नवा पायंडाही या निमित्ताने पाडला गेला. त्यावर विरोधी सदस्य भास्कर जाधव यांनी आक्षेप नोंदवताच हा पायंडा पूर्वीच पाडला गेल्याचे अध्यक्षांनी अगत्याने दाखवून दिले. मराठा आरक्षणावरील भुजबळ यांच्या भाषणाला फारसे ज्येष्ठ मंत्री उपस्थित नव्हते. तसेच, इतर सदस्यांनी त्यांच्या भाषणात भुजबळांवर प्रत्यक्ष, तर काहींनी नाव न घेता टीकाही केली. यावरही मुख्यमंत्र्यांचे शेतकरी प्रश्नावरील चर्चेप्रमाणेच ठोस कोणतेही उत्तर मिळाले नाही. फेब्रुवारीत यासाठी विशेष अधिवेशन घेणे, हा मराठा आरक्षणावर तोडगा कसा काय असू शकतो? पण या प्रश्नाची चर्चाच झाली नाही.नाही म्हणायला विधान परिषदेत मात्र विरोधी पक्षनेते शिवसेनेचे अंबादास दानवे यांनी अत्यंत आक्रमक व अभ्यासपूर्ण पद्धतीने सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. नवाब मलिक हे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सत्ताधारी बाकांवर बसल्याचे लक्षात येताच त्यांनी सरकारला त्यावरून इतके कोंडीत पकडले की मलिक हे त्यानंतर अधिवेशनात आलेच नाहीत. त्यामुळेच, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आपण 'राष्ट्रवादी'ची कानउघाडणी करत असल्याचे दाखवावे लागले. मराठा आरक्षण, ललित पाटील ड्रग प्रकरण आदी अनेक प्रश्नांवर दानवे यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार प्रहार केले. शेवटी, या अधिवेशनात ५५ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या हाच काय तो विक्रम झाला! त्यातही सभागृहाबाहेर सत्ताधारी आमदारांमध्ये त्यांच्या मतदारसंघास किती निधी मिळाला, याच्या बढाया सर्रास ऐकण्यास मिळत होत्या. त्यातच काँग्रेसच्या चार मोठ्या नेत्यांचे मतदारसंघही विकासनिधीने पावन झाले. त्याची नाराजी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत उमटली. या सगळ्या गदारोळात विदर्भाच्या प्रश्नांवर फारशी गंभीर चर्चा झालीच नाही. याचे वैषम्य फडणवीस यांनी विरोधकांकडे बोट दाखवत बोलूनही दाखवले. मात्र, त्याबाबतही केवळ प्रत्यारोपाच्या फैरीच झडल्या. अखेर अधिवेशनाचे फलित काय, या घोंघावणाऱ्या प्रश्नासह त्याचे सूप वाजले!

# झाले मोकळे आकाश!



कृत्रिम प्रज्ञा अर्थात 'एआय' या आधुनिक तंत्रज्ञानाच्या गैरवापराची अनेक उदाहरणे आपल्या समोर आहेत. ही उदाहरणे पाहिल्यानंतर, नको ते तंत्रज्ञान, असेच आपल्याला वाटणे स्वाभाविक आहे. मात्र, तंत्रज्ञानाचा सदुपयोगही होऊ शकतो हे हिमाचल प्रदेशमधील संशोधकांनी दाखवून दिले आहे. या राज्यातील कांगडी या बोलीभाषेचे 'एआय'च्या मदतीने हिंदी व इंग्रजीमध्ये भाषांतर करण्यात या संशोधकांना यश मिळाले आहे. त्यामुळे विशिष्ट प्रदेशापुरती मर्यादित राहिलेल्या कांगडी भाषेला आकाश मोकळे झाले आहे.कांगडी ही उत्तर भारतात बोलली जाणारी इंडो-आर्यन भाषा आहे. ही प्रामुख्याने कांगडा खोऱ्यातील लोकांशी संबंधित आहे. मुख्यतः हिमाचल प्रदेशातील कांगडा, उना आणि हमीरपूर तसेच मंडी आणि चंबा या जिल्ह्यांच्या काही भागांमध्ये तसेच पंजाबमधील गुरुदासपूर, रूपनगर आणि होशियारपूर या जिल्ह्यांमध्ये कांगडी भाषा बोलली जाते. जम्मूमधील दुग्गा आणि पाकिस्तानमधील काही गावांमध्येही कांगडी बोली बोलली जाते. कांगडी भाषा पंजाबी भाषेशी साधर्म्य असलेली आहे. हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्याच्या नावावरून या पहाडी बोलीभाषेला कांगडी हे नाव पडले आहे. या बोलीभाषेची तुलना हिंदी, पंजाबी आणि डोगरी या भाषांशी केली जाते.विशिष्ट प्रदेशात बोलली जाणारी ही बोलीभाषा इतर बोलीभाषांप्रमाणे विशिष्ट जनसमुदायापुरतीच मर्यादित राहिली होती. या बोलीभाषेचे हिंदी किंवा इंग्रजीत भाषांतर करण्याचे प्रयत्न संशोधकांकडून सुरू होते. अखेर 'नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी' (एनआयटी) या हमीरपूरमधील तंत्रज्ञान विद्यापीठातील संशोधकांना कृत्रिम प्रज्ञेच्या (एआय) मदतीने कांगडी बोलीचे हिंदी व इंग्रजीत भाषांतर करण्यात यश लाभले. त्यासाठी या संशोधकांनी प्रगत संगणकाच्या साह्याने कांगडी बोलीचे भाषांतर करण्यासाठी एक मॉडेल तयार केले आहे. हिमाचल प्रदेश सरकारच्या भाषा आणि संस्कृती विभागानेही या प्रकल्पात मदत केली आहे. हे मॉडेल तयार करण्यासाठी 'एनआयटी' तज्ज्ञांना दोन वर्षे लागली. हे मॉडेल 'एआय'च्या मदतीने प्रगत संगणकांवर प्रोग्रॅमिंग करून विकसित करण्यात आले असून, लवकरच ॲप बनवण्याचे कामही सुरू करण्यात येणार आहे. याद्वारे सामान्य नागरिकही ॲप वापरून कांगडीचे हिंदी आणि इंग्रजीमध्ये भाषांतर करू शकतील. कांगडी ही रूपात्मकदृष्ट्या समृद्ध भाषा आहे. अशा भाषांमध्ये काळ, मनस्थिती, पैलू, व्यक्ती, लिंग, संख्या इत्यादी दर्शविण्यासाठी शब्दांमध्ये अनेकदा बदल केले जातात. त्यामुळे अशा भाषांच्या अनुवादाचे काम अधिक गुंतागुंतीचे असते. म्हणून त्याचे महत्त्व जरा अधिकच आहे.'एआय' तंत्रज्ञानाच्या आधारे तयार केलेल्या या मॉडेलमध्ये पहिल्या टप्प्यात कांगडी बोलीभाषेतील दोन लाख वाक्ये टाकण्यात आली आहेत. या दोन लाख कांगडी वाक्यांचा हिंदी व इंग्रजी भाषेत अनुवाद करण्यात आला आहे. त्यात हळूहळू आणखी कांगडी वाक्यांची भर टाकली जाणार आहे. 'एनआयटी' हमीरपूरच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभागातील सहायक प्राध्यापक पी. डॅनियल यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. विद्वान श्वेता चौहान आणि शेफाली यांनी हे मॉडेल विकसित केले आहे. 'एनआयटी'च्या अनेक बी. टेक आणि एम. टेक विद्यार्थ्यांनी या प्रकल्पात सहभाग निश्चित केला आहे. दरम्यान, या प्रकल्पामुळे कांगडी भाषेतील साहित्यिक, सांस्कृतिक खजिना अन्य भाषिकांसाठी खुला होऊ शकणार आहे.कांगडी बोलीभाषेच्या संवर्धनासाठी केलेल्या कार्याबद्दल संशोधक श्वेता चौहान यांना भाषा आणि संस्कृती विभागाकडून वुमन पॉवर पुरस्काराने सन्मानितही करण्यात आले आहे. 'या प्रकल्पाच्या निर्मितीमध्ये भाषा आणि संस्कृती विभागाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. 'युनिव्हर्सल डिपेन्डन्सीज' (सार्वत्रिक अवलंबित्व – यूडी) टॅग देण्यासाठी शिक्षक भूपेंद्र भूपी आणि राजीव त्रिगार्ती यांची खूप मदत झाली. कांगडी बोलीतील लेखकांच्या मदतीने दोन लाख वाक्यांचा संग्रह विकसित करून मॉडेलमध्ये फीड करण्यात आला आहे', असे पी. डॅनियल आणि श्वेता चौहान यांनी सांगितले.'एनआयटी'च्या या संशोधकांनी 'यूडी टॅग' प्लॅटफॉर्मवरही काम केले आहे. यूडी प्लॅटफॉर्मवर कांगडी बोलीच्या ३०० वाक्यांचे टॅग नोंदवले गेले आहेत, जेणेकरून कांगडी बोलीतील संज्ञा आणि सर्वनामांच्या तंत्राच्या मदतीने ते ॲप्स आणि इतर प्रणालींमध्ये वापरता येतील. कांगडी भाषा सध्याच्या 'यूडी' भाषांच्या आंतरराष्ट्रीय डॅशबोर्डवर मे २०२१पासून आहे. या डॅशबोर्डवर फक्त दहा भारतीय भाषा आहेत आणि कांगडी ही त्यापैकी एक आहे. गुगलने आता टायपिंगसाठी कांगडी कीबोर्डही सादर केला आहे.सन २०११च्या जनगणनेनुसार, कांगडी बोलीभाषा भारतातील सुमारे १७ लाख लोक बोलतात. यामध्ये अस्खलित भाषिकांचा अगदी छोटासा अंश आहे. कांगडी भाषा टाकरी आणि देवनागरी लिपीमध्ये लिहिली जाते. अनेक बोलीभाषांप्रमाणे कांगडी ही बोलीभाषा शेजारच्या भाषांसह एक बोली सतत तयार करते. यामध्ये पूर्वेकडील मांडेली आणि कुल्लुई, उत्तरेकडील चंबेली, गड्डी आणि भाटेली तसेच आग्नेय ते कहलुरी येथे बोलल्या जाणाऱ्या पहाडी बोलीभाषांचा समावेश होतो. कांगडी ही पंजाबी किंवा डोगरी या भाषांसारखी स्वराची भाषा आहे, परंतु त्यांच्या तुलनेत कांगडीमध्ये स्वरांची नियुक्ती वेगळी आहे. काही डोगरी आणि पंजाबी भाषिकांनी कांगडीला त्यांच्या भाषेचा भाग म्हणून संबोधले आहे. त्याचे कारण या भाषांमधील समानता आणि परस्पर सुगमता हे आहे.

सह्याद्रीचा राखणदार



# तर तुम्हाला महाराष्ट्रात फिरणं मुश्किल होईल;मनोज जरांगेंचा सरकारला इशारा

**सेलू**–सरकारने आता भानावर यावं, असं म्हणत मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर टीकास्त्र डागलं आहे. सरकारने आता तरी भानावर यावं. पहिल्यांदा एकदा आमचा कार्यक्रम करून बघितला. मात्र, आता नोटीसी देऊन जर काही करण्याचा प्रयत्न केला तर, तुम्हाला महाराष्ट्रात फिरणे मुश्किल होईल, असा निर्वाणीचा इशारा मनोज जरांगे यांनी परभणीच्या सेलू येथे आयोजित सभेत दिला आहे. परभणीत जरांगेंची भव्य सभा मनोज जरांगे यांच्या तीन सभा आज परभणी जिल्ह्यात होत आहेत. त्यातली पहिली सभा सेलू येथील नूतन महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडली. यावेळी बोलताना मनोज जरांगे यांनी सरकारला इशारा देत ही लढाई आता अंतिम टप्प्यात आली आहे. सरकारने तडजोडीसाठी हालचाल करावी, पुढे यावं अन्यथा २४ तारखेनंतर सरकारने सरकारचा रस्ता धरावा, आम्ही आमचे आरक्षण घेतल्याशिवाय गप्प बसणार नाही, असं म्हटलं आहे.आम्ही मुंबईला जाणार नाहीत, तशी घोषणाही दिली नाही मात्र तरीही आमच्या पोरांना नोटीसा दिल्या जात आहेत, जर तुमची इच्छाच असेल तर आम्ही नक्कीच मुंबई बघायला येऊ असंही जरांगे म्हणाले आहेत. आम्ही कायद्याच्या मार्गाने आरक्षण मागत असू अन् तुम्ही नोटिसा देत असाल तर मग आम्ही काय करणार. एखाद्याची गाडी अडवली तर, सगळ्याच गाड्या तिकडे घेऊन जायच्या. मात्र पोलिसांना सहकार्य करा त्यांचा दोष नाही वरच्यांचा आहे, असंही जरांगे यांनी म्हटलं आहे.मी मराठ्यांसाठी अन् आरक्षणासाठी मरायला भीत नाही. मी ४ महिने झालं घराचा उंबरा शिवला नाही. माझी मायाबापाशी गद्दारी करणारी औलाद नाही. हा लढा जिंकायचा आहे. माझं कुटुंब हे मराठा समाज आहे, समाजासाठी मरायची ही तयारी ठेवली आहे. एकजूट फुटू देऊ नका राजकारण्यांचे ऐकू नका, असं म्हणत जरांगेंनी मराठा समाजाला एकत्र येण्याचं आवाहन केलं आहे.

### 'आता आरक्षण घेतल्याशिवाय माघार नाही'

**आता पोरांचे वाटोळे नाही होऊ द्यायचं नाही. तुम्ही माझ्या खांद्याला खांदा लावून लढा. मला डॉक्टरने सांगितलं आराम करा, पण आता आरक्षण मिळण्याची वेळ आलीय. माझं शरीर आता मला साथ देत नाहीये, पण मी थांबणार नाही. मी एक इंच ही मागे हटणार नाही. आता आरक्षण घेतल्याशिवाय माघार नाही, असं जरांगे यांनी स्पष्ट केलं आहे.**



## स्थगित झालेले मराठा आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा:महायुती सरकारचा मोठा विजय–बावनकुळे

**मुंबई**–मराठा आरक्षणासाठीची क्युरेटिव्ह पिटीशन सुप्रीम कोर्टाने स्वीकारली आहे. हा महायुती सरकारचा मोठा विजय असल्याचे मत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. मराठा आरक्षणासंदर्भात क्युरेटीव्ह याचिका स्वीकारल्यानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्विट केले आहे. यामध्ये त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या नाकर्तेपणामुळे स्थगित झालेले मराठा आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे.दरम्यान मराठा आरक्षणासंदर्भात सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. सुप्रीम कोर्टाने मराठा आरक्षणाची क्युरेटिव्ह पिटीशन स्वीकारली आहे, येत्या २४ जानेवारीला या संदर्भात निकाल देण्यात येईल, असा दावा मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी केला आहे.राज्यातील महायुती सरकारने भक्कमपणे सुप्रीम कोर्टात बाजू मांडल्यामुळे कायदेशीर मराठा आरक्षण मिळण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. मराठा आरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली क्युरेटिव्ह पिटीशन सुप्रीम कोर्टाने स्वीकारली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि मविआ सरकारच्या नाकर्तेपणामुळे स्थगित झालेले मराठा आरक्षण पुन्हा मिळण्यासाठीचा मार्ग प्रशस्त झाला. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना यांनी कुठल्याही प्रवर्गाला धक्का न लावता मराठा समाजाला दिलेले आरक्षण पुन्हा मिळविण्यासाठी महायुती सरकार सर्वोच्च न्यायालयात आपली बाजू मजबुतीने मांडेल आणि मराठा समाजाला न्याय देईल ही खात्री आहे. जय जिजाऊ– जय शिवराय मराठा आरक्षण निर्णयाचा फेरविचार व्हावा आणि पुन्हा एकदा बाजू ऐकून घेतली जावी म्हणून महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात क्युरेटिव्ह पिटीशन दाखल केली होती. ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने दाखल करून घेतली आहे. तसेच येत्या २४



जानेवारी रोजी या याचिकेवर सुनावणी ठेवली आहे. सरन्यायाधीशांसह चार न्यायाधीशांसमोर या याचिकेवर सुनावणी होणार आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.मराठा आरक्षणावरुन राज्यात गेल्या काही महिन्यांपासून मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्त्वात संपूर्ण समाज रस्त्यावर उतरला आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळालेच पाहिजे, यासाठी जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरु झाले. त्यात मधल्या काळात लाठीचार्ज झाला आणि आंदोलन अधिकच उग्र झाले. त्यामुळे सरकारला देखील दोन पावले मागे घेत जरांगे यांच्या मागणीनुसार कुणबी नोंदी शोधण्यासाठी समिती स्थापन करावी लागली. त्यात यश आले असून आता मराठा समाजातील बांधवांना ज्यांच्या नोंदी सापडल्या त्यांना आता कुणबी दाखले देण्यास सुरुवात झाली आहे.एकीकडे या मागणीला काही अंशी यश मिळत असले तरी मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण मिळाले पाहिजे, या मागणीसाठी सरकारच्या वतीने सुप्रीम कोर्टात क्युरेटिव्ह पिटीशन टाकली गेली. यासंदर्भात आता क्युरेटिव्ह पिटीशन स्वीकारल्याचा दावा याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी केला आहे. त्यांनी यासंदर्भात ट्विटरवर माहिती दिली.

## सरकारने विचार करून शब्द द्यावा–बच्चू कडू

**बीड**–आमदार बच्चू कडू यांनी बीडमध्ये आज मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे. बीडमध्ये आज मनोज जरांगे यांची निर्णायक सभा पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेऊ नये म्हणून आमदार बच्चू कडू आणि मुख्यमंत्र्यांचे विश्वासू मंगशे चिवटे यांनी सभेपूर्वी जरांगे पाटील यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. मात्र पण जरांगे यांनी आपली भूमिका सोडली नाही. उलट जरांगे यांची समजूत घालण्यासाठी गेलेल्या बच्चू कडू यांनी जरांगे यांच्या उद्याच्या आंदोलनात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे.यावेळी बोलतांना बच्चू कडू म्हणाले, ''सरकारने मनोज जरांगे यांना काही शब्द दिले होते. मात्र सरकारला आश्वासने पूर्ण करता आली नाहीत, हे दुर्दैवी आहे. सरकारला आता जर एखादा शब्द द्यायचा असेल तर आधी त्याचा पूर्ण विचार करून द्यावा. शब्द दिला आणि तो पूर्ण करू शकलो नाही तर त्याचा समाजमनावर परिणाम होतो. लोकांच्या मनात सरकारविरोधात भावना निर्माण होतात. उग्र प्रतिक्रिया उमटू लागतात'', असे मत बच्चू कडू यांनी व्यक्त केला आहे.पुढे बोलताना बच्चू कडू



म्हणाले, ''मुळात सोयरे म्हणजे जिथे आपली सोयरीक होऊ शकते. आपली सोयरीक आपल्या जातीत होते, असे मनोज जरांगे यांचे म्हणणं आहे. मात्र सरकारने सोयरे शब्दाचा चुकीचा अर्थ काढला. त्यामुळे आधी सोयरे या शब्दाची व्याख्या करणं गरजेचे आहे. व्याख्या झाली तर आपल्याला पुढे जाता येईल'', असे कडू म्हणाले.''काहीच फलित झाले नाही तर आंदोलन उभे राहील. आम्ही रोखा म्हटले तरी समाज ऐकणार नाही. आंदोलन सरकारच्या सोयीचे नसते. समाज म्हणून न्याय मिळायला हवा, त्यामुळे आंदोलक म्हणून मी इथेच थांबणार आहे. आंदोलक म्हणून उद्या आंदोलन झाले तर उद्या आंदोलनात बसेल, असेही बच्चू कडू यांनी स्पष्ट केले.

## महात्मा फुले वाडा, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक विस्तारासाठी १०० कोटींचा निधी–अजित पवार

**पुणे**–महात्मा फुले वाडा व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक विस्तारासाठी १०० कोटींचा निधी देण्यात येईल, स्मारकाची रचना आकर्षक आणि भव्य प्रकारची करावी, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.राष्ट्रीय स्मारक भिडेवाडा तसेच महात्मा फुले वाडा व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक विस्ताराबाबत शासकीय विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ (दूरदृश्य प्रणालीद्वारे), पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे आदी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, स्मारकासाठी आलेल्या आराखड्याच्या विविध पर्यायांवर विचार करून चांगला पर्याय निवडण्यात येईल. स्मारक विस्तारासाठी जागा संपादन आणि तिथल्या नागरिकांच्या पुनर्वसनाचे नियोजन करण्यात यावे, असे त्यांनी सांगितले.भिडेवाडा स्मारकाच्या जागेत मुलींसाठी अत्याधुनिक प्रशिक्षणाची सुविधा करण्याचा विचार करावा. जागेची मर्यादा लक्षात घेऊन आराखडा तयार करावा. याबाबत लवकरच बैठक घेऊन आराखड्याचे स्वरूप निश्चित करता येईल. स्मारकाची इमारत बाहेरून जुन्या काळातील वाटेल



आणि आतल्या बाजूने सुसज्ज असेल, अशी व्यवस्था करावी. भिडेवाडा येथील राष्ट्रीय स्मारक प्रेरणादायी ठरावे यासाठी स्मारकाचा आराखडा तयार करताना त्यात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे प्रेरक कार्य आणि अत्याधुनिक शैक्षणिक सुविधांचा अंतर्भाव असावा. या स्मारकासाठी शासनातर्फे सर्व सहकार्य करण्यात येईल, असे श्री. पवार म्हणाले.मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, पहिली मुलींची शाळा म्हणून भिडेवाड्याचे महत्व असल्याने याठिकाणी आधुनिक पद्धतीची मुलींची शाळा असावी. शाळेत अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा असाव्यात. इमारतीचा दर्शनी भाग जुन्या काळातील वाटावा. इमारतीत सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याची माहिती देणारी शिल्पे असावी. इथे शिकणाऱ्या मुली स्पर्धा परीक्षेसाठी तयार व्हाव्यात यासाठी आवश्यक सुविधा असाव्यात. मराठी आणि इंग्रजीतील आदर्श शिक्षकांची समिती तयार करून इथे देण्यात येणाऱ्या शिक्षणावर लक्ष ठेवण्यात यावे. स्मारकात परदेशी पर्यटकांना माहिती देण्याची व्यवस्था असावी.या वास्तूचे 'सावित्रीबाई फुले पहिली मुलींची शाळा' असे नामकरण करण्यात यावे. त्याचप्रमाणे महात्मा फुले वाडा व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक विस्तारासाठी भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी अशा सूचना मंत्री छगन भुजबळ यांनी केल्या.यावेळी राष्ट्रीय स्मारक भिडेवाडा तसेच महात्मा फुले वाडा व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक विस्ताराबाबत सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली.

## गायीच्या दुधाला प्रति लिटर ५ रुपये अनुदान देण्याचा शासनाचा निर्णय स्वागतार्ह – माजी मंत्री हर्षवर्धन पाटील

**पुणे**–महायुती सरकारचा दुधाला ५ रुपये अनुदान देण्याच्या निर्णयाने दूध उत्पादकांना दिलासा मिळाला आहे असे मत माजी सहकार मंत्री - हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केले.महायुती सरकारने गाईच्या दुधास प्रति लिटरला ५ रुपये अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्याच्या निर्णयामुळे आर्थिक अडचणीच्या आलेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.महायुती सरकारचा हा निर्णय स्वागतार्ह आहे,अशी माहिती माजी मंत्री व भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर येथे शुक्रवारी (दि.२२) रोजी दिली. तसेच याप्रसंगी हर्षवर्धन पाटील यांनी दूधगंगा दुध उत्पादक सहकारी संघाची नियोजनबद्ध रित्या प्रगतीपथाकडे वेगाने वाटचाल सुरू असल्याबद्दल गौरवोदगार काढले.इंदापूर येथे दूधगंगा सहकारी संघाच्या कार्यालयामध्ये आयोजक पत्रकार परिषदेत हर्षवर्धन पाटील बोलत होते.यावेळी अनुदान वाढीसाठी महायुती सरकारकडे पाठपुरावा केल्याबद्दल हर्षवर्धन पाटील व राजवर्धन पाटील यांचा दूधगंगा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सन्मान करीत आभार व्यक्त केले.यावेळी दूध संघाचे अध्यक्ष उत्तम जाधव, उपाध्यक्ष विक्रम कोरटकर,दूध संघाचे संचालक राजवर्धन पाटील,विलासराव वाघमोडे,शहाजीराव शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, राज्य शासनाच्या या निर्णयामुळे दूध उत्पादन शेतकऱ्यांना दि.१ जानेवारी पासून गाईच्या दुधाला प्रतिलिटर किमान रु. ३४ एवढा दर मिळणार



आहे.दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या घोषणेनुसार गायीच्या ३.२ फॅट व ८.३ एसएनएफ दुधाला रु.२९ दर सहकारी दूध संस्थांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या वैयक्तिक बँक खात्यावर ऑनलाईन पद्धतीने अदा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानंतर सरकारच्या वतीने प्रति लिटर ५ रुपये प्रमाणे रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात येणार आहेत.दुधाचे दर घसरल्याने दूध उत्पादक, शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आल्याने मी व दूधगंगा दूध उत्पादक सहकारी संघाचे संचालक राजवर्धन पाटील आंम्ही दुग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मुंबईत ६ नोव्हेंबरला वेळ मागून भेट घेतली व निवेदन दिले.त्यानंतर विखे पाटील यांनी दुग्ध खात्याच्या अधिकाऱ्यांची अनुदाना संदर्भात बैठक घेतली.तसेच दि. २० नोव्हेंबर रोजी पुन्हा भेट घेऊन शेतकऱ्यांना रु. ७ प्रति लिटर याप्रमाणे अनुदान द्यावे, अशी मागणी केली.त्यानंतर दुग्धविकास मंत्री विखे पाटील यांनी दि.२१ नोव्हेंबर रोजी सह्याद्री अतिथीगृहावर दूध दरवाढीवर चर्चा करण्यासाठी सर्व संबंधितांची बैठक घेतली. राज्यभरातून अनेक संघटनांनी गाईच्या दूध खरेदीच्या दरात वाढ करण्याची मागणी केली होती.असे हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी सांगितले.हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीमध्ये दूध व्यवसायाचा सिंहाचा वाटा आहे.मी अकलूजच्या शिवामृत संघाचा संचालक व पुणे जिल्हा दूध संघाचा (कात्रज)चा संचालक म्हणून काम करीत असताना दुग्ध व्यवसाय वाढीसाठी नियोजनबद्ध पद्धतीने मांडणी केली.दूध धंद्यामध्ये सुशिक्षित युवक,महिला,शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी मोठ्या संख्येने कार्यरत आहेत.दूधगंगा दूध संघामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दूध व्यवसायाला स्थिरता प्राप्त झाली आहे.मध्यंतरी दूध संघ अडचणीत आला होता.मात्र आता अमुल शी करार केल्याने दूध संघ वेगाने प्रगती करीत आहे.शेतकऱ्यांना दहा दिवसाला पेमेंट केले जात असून, महिन्याला १२ कोटी रुपयांचे दूध पेमेंट शेतकऱ्यांना दिले जात आहे.दूध संघाचे संकलन प्रतिदिनी १ लाख लिटर झाले आहे. असे गौरउद्गगार ही हर्षवर्धन पाटील यांनी काढले. तालुक्याच्या विकासासाठी नेतृत्वाकडे दूरदृष्टी लागते.दुर्दैवाने गेल्या १० वर्षात तालुक्यात एकही सहकारी संस्था निघाली नाही अथवा सामान्य जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी एकही काम झालेले नाही,अशी खंतही यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केली.

### दूधगंगा संघाकडून हर्षवर्धन पाटील व राजवर्धन पाटील यांचा सत्कार.

**राज्य शासनाकडे गेली दोन महिने दुधाला अनुदान द्यावे या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केल्याने यश झाल्याबद्दल दूधगंगा दूध उत्पादक सहकारी संघाच्या वतीने यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व दूधगंगा दूध संघाचे संचालक राजवर्धन पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी दुग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व महायुती सरकारचे दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने आभार व्यक्त केले.**

सह्याद्रीचा राखणदार



# आ.धस यांनी दूध उत्पादकांच्या व्यथा शासनाकडे प्रभावी मांडल्यामुळे पाच रुपये अनुदान घोषित

## दुध उत्पादक शेतकऱ्यांकडून आ.धस यांचे आभार



**पाटोदा–दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. राज्यातील सहकारी दूध संघांमार्फत संकलित होणाऱ्या गाईच्या दूधासाठी दूध उत्पादकास प्रति लिटर ५/–रुपये अनुदान देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. ही योजना राज्यातील फक्त सहकारी दूध उत्पादक संस्थांमार्फत येणार असल्याचे विखे पाटील म्हणाले. दरम्यान, या साठी सहकारी दूध संघाने दूध उत्पादक शेतकऱ्यांना ३.२ फॅट आणि ८.३ ता प्रति लिटर योजना १ जानेवारी–२०२४ ते दिनांक २९ फेब्रुवारी–२०२४ या कालावधीसाठी लागू किमान २९ रुपये दूध दर शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रोख जमा करणे बंधनकारक आहे. त्या नंतर शेतकऱ्यांना शासनामार्फत ५/– रुपये प्रति लिटर बँक खात्यावर वर्ग करण्यात येतील असे विखे पाटील म्हणाले.**

या बाबत विधान परिषदेचे आमदार सुरेश धस यांनी अधिवेशनात उत्पादकांना वाढीव भाव देण्याबाबत प्रश्न मांडला होता. तसेच मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेऊन दुधाबाबत निर्णय घ्या असे ही मागणी देखील आ.धस यांनी प्रथम केली होती या मागणीला यश आले आहे. दूध उत्पादकांच्या व्यथा शासनाकडे प्रभावी मांडल्यामुळे ५/– रुपये अनुदान घोषित करण्यात आले असुन आ.सुरेश धस हे दुध उत्पादक शेतकऱ्यांचे तारणहार ठरले असुन दुध उत्पादक शेतकऱ्यांनी आ. सुरेश(आण्णा)धस यांचे आभार मानले आहेत. दूध उत्पादक शेतकरी यांनी केलेल्या मागणीला यश आले असून आपण नागपूर येथे सुरू असलेल्या अधिवेशन काळात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, दुग्ध विकास मंत्री राधकृष्ण विखे पाटील यांच्या कडे या बाबत वेळोवेळी पाठपुरावा केला होता. त्या वर आता राज्य सरकारने सकारात्मक निर्णय घेऊन शेतकरी वर्गाला दिलासा दिल्याबद्दल सरकारचे मनःपूर्वक आभार विधान परिषदेचे आ.सुरेश धस यांनी मानले. दरम्यान, डीबीटी करण्यासाठी दूध उत्पादक शेतकऱ्यांचे बँक खाते हे त्याच्या आधार कार्डशी आणि पशुधनाच्या आधारकार्डशी लिंक असणे आवश्यक आहे. त्याची पडताळणी करणे आवश्यक राहील. ही योजना दिनांक ०१ जानेवारी–२०२४ ते दिनांक २९ फेब्रुवारी–२०२४ या कालावधीसाठी लागू राहणार आहे. त्या नंतर आवश्यकतेनुसार आढावा घेवून मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. ही योजना आयुक्त (दुग्धव्यवसाय विकास) यांच्या मार्फत राबविली जाणार आहे, या बाबतीत शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्यात येणार आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित जोपासण्याचा सरकारचा प्रयत्न असुन दुध आणि दुग्धजन्य पदार्थाचे भाव हे प्रामुख्याने मागणी व पुरवठा आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील दुध भुकटी व बटरचे दर या वर अवलंबून असतात. त्या नुसार आंतरराष्ट्रीय बाजारात दूध भुकटी व बटरचे दर कमी झाल्यास दुधाचे दर कमी होतात. या शिवाय दुधाच्या पुष्ट काळातही दुधाचे दर कोसळतात ही वस्तुस्थिती असल्याचे विखे पाटील म्हणाले. दरम्यान असे असुन ही राज्यातील दूध उत्पादक निर्णय घेतला आहे, शेतकऱ्यांचे आर्थिक हित जोपासण्यासाठी शासन विशेष परिस्थितीत बाजारात उचित हस्तक्षेप करत आहे. दुध उत्पादक शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न करत आहोत. त्या अनुषंगाने शासनाने या पूर्वी राज्यातील अतिरीक्त दुधाचे नियोजन करण्यासाठी अनुदान योजना राबविली होती. त्या नुसार शासनाने शेतकऱ्यांचे अतिरीक्त दूध स्वीकारून त्याचे दुध भुकटी व बटरमध्ये रूपांतरण करून अतिरीक्त दुधाचा प्रश्न मार्गी लावला होता आता ही सरकारने दूध उत्पादक शेतकऱ्यांना ५/– रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला असून या साठी विधान परिषदेचे आमदार सुरेश धस यांनी वेळोवेळी पत्र व्यवहार तसेच विधिमंडळात आवाज उठवला होता त्यांच्या या मागणीची राज्य सरकार ने तात्काळ दखल घेऊन विशेष बैठक बोलावली होती. या मागणीची दखल घेत राज्याचे दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ५/– रुपये अनुदान देण्याची घोषणा केली आहे.

## नीलेश राणे आता विधानसभेच्या आखाड्यात

# राजकारण सोडण्याची केली होती घोषणा, पण आता कुडाळ विधानसभा लढवण्याची चर्चा



**सांगली**–सांगलीतील एका कार्यक्रमात माजी खासदार नीलेश राणे यांनी विधानसभा लढण्याचे संकेत दिले आहेत. आगामी २०२४ च्या निवडणुकीनंतर विधिमंडळाच्या सभागृहात सम्राट महाडिक आणि नीलेश राणे दिसतील, असा दावा नीलेश राणे यांनी केला आहे. शिराळा विधानसभेसाठी इच्छुक सम्राट महाडिक हे नक्की आमदार होणार हे सांगताना आपण देखील निवडणूक लढणार असल्याचे सांगत नीलेश राणे यांनी दोघांचेही निवडणुकीचे रणशिंग व्यासपीठावरून फुंकले आहे.दरम्यान पक्षातील अंतर्गत वादामुळे राजकारणातून निवृत्ती घेत असल्याची घोषणा काही महिन्यांपूर्वी नीलेश राणे यांनी केली होती. मात्र, भाजपकडून त्यांची समजूत काढण्यात आली. नीलेश राणे हे माजी खासदार आहेत. त्यामुळे ते लोकसभा निवडणूक लढतील असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, सांगलीतील एका कार्यक्रमात नीलेश राणे यांनी विधानसभा लढण्याचे संकेत दिले आहेत.

# मराठा समाजाला न्याय मिळेल:२४ जानेवारीला तज्ज्ञ वकिलांची फौज कोर्टात बाजू मांडेल–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई**–मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी २० जानेवारीला मुंबईत आझाद मैदानावर आमरण उपोषण करणार असल्याचे जाहीर केले आहे. तर आरक्षण घेतल्याशिवाय परतणार नसल्याचा इशारा त्यांनी राज्य सरकारला दिला आहे. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की क्युरेटिव्ह पिटीशनमुळे सुप्रीम कोर्टात मराठा समाजाला न्याय मिळेल असे मला वाटते, असे त्यांनी म्हटले आहे.आताच सुप्रीम कोर्टाचा निर्णय झाला आहे. क्युरेटिव्ह पिटीशन २४ जानेवारीला कोर्ट ऐकणार आहे. ही याचिका फेटाळेल असे म्हटले जात होते. पण सुप्रीम कोर्ट हे ऐकणार आहे, त्यामुळे मराठा समाजासाठी मोठा दिलासा आहे. २४ जानेवारीला वकिलांची तज्ज्ञ फौज बाजू मांडेल, मराठा समाज मागास कसा आहे हे सांगेल, परिस्थिती सांगेल. सुप्रीम कोर्टाने ज्या त्रुटी मांडल्या होत्या, त्या दूर करण्याचे काम वकिलांची फौज करेल. मला वाटते मराठा सामाजाला न्याय मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे.दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, मागच्या सरकारने



मविआ सरकारने सुप्रीम कोर्टात मराठा समाजाला मागास ठरवण्यासाठी जे पुरावे द्यायला हवे होते ते मांडले नव्हते. पण यावेळी निष्णात वकिलांची फौज बाजू मांडेल. तोपर्यंत सर्वांनी शांतता राखणे आवश्यक आहे. कायदा सुव्यवस्थता, शांतता राहिली पाहिजे, सर्व जाती धर्मांना माझे आवाहन आहे, सर्वांनी संयम राखावा, मराठा समाजाला नक्की न्याय मिळेल. क्युरेटिव्ह पीटिशन ऐकली जाणे ही जमेची बाब आहे, मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही सर्वांची इच्छा आहे, सत्ताधारी, विरोधक, आंदोलक सर्वांना वाटते मराठा आरक्षण मिळावे ही सर्वांची इच्छा आहे. सुप्रीम कोर्टात आम्ही बाजू मांडू, सर्वांनी शांतता राखावी.मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून अवघा महाराष्ट्र पेटवणाऱ्या मनोज जरांगे पाटलांनी आता मुंबईच्या आझाद मैदानावर आमरण उपोषण करण्याची घोषणा केली आहे. जरांगे यांची शनिवारी बीडमध्ये मराठा आरक्षणाची निर्णायक इशारा सभा पार पडली. त्यात त्यांनी २० जानेवारी रोजी मुंबईला धडकण्याची घोषणा केली. मराठा समाजाने २० तारखेला मुंबईच्या दिशेने कूच करून शांततेत उपोषण करावे. या प्रकरणी समाजाच्या कोणत्याही संघटनेने वेगळी चूल मांडण्याची गरज नाही, असे ते म्हणालेत.मराठा जात संपविण्याचा डाव सरकारकडून केला जात आहे. पण घाबरु नका, मराठा मागे लागला तर दोन पिढ्या तुम्हाला काहीच सुधारणार नाही, असे म्हणत मनोज जरांगे यांनी सरकारला इशारा दिला आहे. तर कोणी दंगा करायला लागला तर तो आपला नाही, जो हिंसा करेन तो आपला नाही, एवढे मात्र नक्की आहे. 'प्रश्न मार्गी लावा, नाटक कशाला असे म्हणत जरांगे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

# गावातील स्वप्ने ते आयआयटी खरगपूर पर्यंतच्या प्रकाशमय मार्गामध्ये दरवळला कष्टगंध



**स्वत:वर विश्वास ठेवा, संयमाला तुमच्या प्रवासाचे मार्गदर्शन करू द्या, प्रत्येक टप्प्यावर चिकाटीचा स्वीकार करा, तुमच्या प्रयत्नांमध्ये चिकाटी ठेवा आणि स्थिर प्रगतीचा साक्षीदार व्हा. संयम, चिकाटी आणि परिश्रम हे तुमचे सहकारी आहेत. माझे यश हे एक सामूहिक विजय आहे, जे माझे पालक, भाऊ, समर्पित शिक्षक आणि अविचल मित्रांच्या पाठिंब्याच्या धाग्याने विणलेले आहे, जे माझ्या प्रवासाच्या प्रत्येक अध्यायात सकारात्मकता निर्माण करते.**
**-------- सुरज भुते**

**माझ्या मुलाने जे यश संपादन केले त्यामुळे आम्हा सर्वांची मान उंचावली आहे. त्याचे यश हे अखंड परिश्रमाच्या जोरावर त्याला मिळालेले आहे. आम्ही सर्व त्याच्या पाठीशी सतत होतो. इथून पुढेही असू.**
**राजेश्वर आणि नुसा भुते, (सुरज यांचे पालक)**

**वरोरा :** लवचिकता आणि विजयाच्या हृदयस्पर्शी कथेत, महाराष्ट्रातील एका निर्मळ खेडेगावातील सूरज भुते यांनी भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय आय टी ) खरगपूर पर्यंतचा एक विलक्षण प्रवास केला आहे.अलीकडेच, सूरज भुते यांनी दीक्षांत समारंभात अध्यक्ष भारताच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या सन्माननीय उपस्थितीत आय आय टी खरगपूर मधून त्यांची सन्माननीय आय आय टी पदवी प्राप्त केली.

आसाळा गावात प्राथमिक स्तरावर शैक्षणिक प्रवास सुरू करून, सुरजने नम्र सुरुवातीच्या पार्श्वभूमीवर आपल्या बुद्धीच्या आणि मेहनतीच्या जोरावर आयआयटी पर्यंतचा प्रवास गाठला. सुरुवातीच्या काळात सूरजला आर्थिक आव्हानांचा सामना करावा लागला, विशेषत: त्याच्या बी.टेकच्या पहिल्या वर्षाची फी भरणे. सूरजचे ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण हे टेंभुर्डा येथील संत तुकडोजी विद्यालयात पूर्ण केले. त्याच्या माध्यमिक शाळेच्या प्रमाणपत्रात(१० वी) ला ८७.६० टक्के गुण मिळवले. ही गाथा वरोरा येथील हिरालाल लोया कनिष्ठ महाविद्यालयात सुरू राहिली, जिथे त्याने त्याच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्रात(१२ वी) ला ८२.३१ टक्के गुण मिळवले. त्यांच्या ज्ञानाच्या शोधामुळे त्यांना अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात नेले, जिथे त्यांनी इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीमध्ये बी.टेक, फ्लाइंग कलर्स आणि ८.४३/१० चे उत्कृष्ट सी.जी.पी.ए. मिळवले. आव्हानांना न जुमानता, सूरजची शैक्षणिक चमक आणखीनच उजळली कारण त्याने एम टेक साठी आय.आय. टी. खरगपूरमध्ये प्रवेश मिळवला, ९.१२/१० च्या उत्कृष्ट सी.जी.पी.ए सह शाखा टॉपर म्हणून उदयास आला. तरीही, सूरजच्या कथनाला शैक्षणिक प्रशंसेच्या पलीकडे आहेत; त्याचा विस्तार समाजसेवेच्या क्षेत्रात होतो. ज्योत – फॉर्म्ड टू एनलाईट या स्वयंसेवी संस्थेचा संस्थापक म्हणून, सूरज नाविन्यपूर्ण कल्पनांद्वारे सामाजिक बदलाला उत्कटतेने मार्गदर्शन करतो. करुणेचा दीपस्तंभ असलेल्या सूरज भुते यांनी आदिवासी समाजाला कपडे दान करण्यापासून ते गरजूंना मदत करण्यापर्यंत १०० हून अधिक समाजसेवेचे उपक्रम त्यांच्या बी.टेक. च्या ४ वर्षाच्या कालखंडात राबवले आहेत. उपेक्षितांसाठी शुल्क. आणि वंचित विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेश आणि आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी त्यांचे परोपकारी प्रयत्न आहेत. करुणेच्या तालबद्ध ठोक्यांपासून ते सामाजिक उन्नतीच्या शिखरापर्यंत, सूरजचे उपक्रम दयाळूपणाचे प्रतीक आहेत.सध्या, सूरज चेन्नईच्या रमन टेक्नॉलॉजी सेंटरमध्ये एआय सायंटिस्ट म्हणून सध्या कार्यरत आहे, हे बहुराष्ट्रीय संस्था एचसीएल चा भाग आहे. या क्षमतेमध्ये, ते आरोग्यसेवा आणि वैद्यकीय विज्ञानामध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी ए.आय /एम एल मधील त्यांचे कौशल्य वापरत संशोधन करत आहेत. शिक्षण आणि सामाजिक विकासासाठी त्यांचे समर्पण आय.आय. टी खरगपूर येथे शिक्षक सहाय्यक म्हणून त्यांच्या भूमिकेतून दिसून येते, जिथे ते विविध विषयांतील विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे देण्यातून दिसून येते.सूरजचे यश केवळ शैक्षणिक कामगिरीपुरते मर्यादित नाही. १३४/२०० चा उल्लेखनीय एम एच टी – सी ई टी स्कोअर आणि ऑल इंडिया रँक ८०० हे गेट परीक्षेतील गुण त्याच्या उत्कृष्टतेची वचनबद्धता आणखी अधोरेखित करतात.कोविड–१९ महामारीचा सामना करताना, सूरजने ज्योत फाउंडेशन (संस्था ) अंतर्गत २०० हून अधिक विद्यार्थ्यांना गेट परीक्षेसाठी मार्गदर्शन करून सकारात्मक प्रभाव पाडणे सुरू ठेवले. सुरज भुतेची कथा प्रेरणा देत राहिल्याने, ती शिक्षणाच्या परिवर्तनीय शक्तीचा, चिकाटीचा आणि देशातील सर्वात जुन्या आय.आय. टी मध्ये यशाच्या शिखरापर्यंतच्या नम्र गावापासून सुरुवातीच्या मार्गावर प्रकाश टाकण्याच्या क्षमतेचा पुरावा म्हणून काम करते.

## इंडियाच्या एकाजुटीच्या ताकदीला केंद्र सरकार घाबरले

# मविआत कोण कुठली निवडणूक लढेल हे पुढच्या १५ दिवसात कळेल – सुप्रिया सुळे

**मुंबई**–महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीच्या बैठकीच्या माध्यमातून कोण कुठली निवडणूक लढेल हे पुढच्या १५ दिवसात कळेल, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चिन्हाबाबतच्या प्रश्नावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, केंद्रीय निवडणूक आयोगावर आपला पूर्ण विश्वास असून आम्हाला योग्य न्याय मिळेल. इंडिया आघाडी आणि महाविकास आघाडीची एकवाक्यता आहे. इंडिया आघाडीच्या एकाजुटीला ताकदीला केंद्र सरकार घाबरले आहे, म्हणून आम्हाला बाहेर काढले, असे म्हणत त्यांनी निलंबनावर प्रतिक्रिया दिली आहे.



दरम्यान सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाले की, मला दडपशाही मान्य नाही, दिल्लीत जे चाललंय त्यावर विश्वास ठेवा. ते लोकशाही वाचविण्यासाठी सुरू आहे. अशोक चव्हाण भाजपात जाणार आहेत, यावर बोलताना अशा प्रकारच्या गोष्टी मला माहीत नाहीत, त्यांना विचारा. जागा वाटपाबाबत इथे आणि दिल्लीत चर्चा होईल. उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा सुरू आहे. चर्चा होऊ द्या, त्यानंतर तुम्हाला कळेल, असे त्यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, अजित पवार यांच्यावरील आरोपाबाबत तुम्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारावा. मुश्रीफ यांच्या बाबत माझ्या मनात प्रेम आहे. मुश्रीफ आरोपी आहेत की नाही हे भाजपने सांगावे. समरजित घाटगे यांच्यावर अन्याय झाला तर भाजपाने माफी मागावी. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काही अडचण असेल असे म्हणणे बाळबोध बोलण्यासारखे होईल. मराठा आरक्षणा बाबत सरकार आणि मनोज जरांगे पाटील यांच्यात चर्चा सुरू होती.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मॅच फिक्सिंग करणे ही चांगली गोष्ट नाही. लोकशाहीत आपले मत मांडण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. भाजप महिला विरोधी पक्ष आहे. महिला कर्तृत्ववान, सक्षम झाल्याचे भाजपाला आवडत नाही. देशात अघोषित आणीबाणी निर्माण झाल्याचे आम्हाला दिल्लीत पदोपदी अनुभवायला मिळत असल्याचा आरोप सुप्रिया सुळे यांनी केला आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .